**(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद )**

**मुंबई येथील उच्च न्यायालय**

**औरंगाबाद खंडपीठ**

**कौटुंबिक न्यायालय अपील क्रमांक – १८/२०२४**

अमेया अरुण कुलकर्णीचा मुलगा

वय : २७ वर्षे, धंदा : व्यवसाय,

रा: वराड, समता नगर, सावेडी,

अहमदनगर, जि. अहमदनगर. ...अपीलकर्ता

विरुद्ध

ईशा अमेया कुलकर्णी ची पत्नी

(ईशा पराग महाजन ची मुलगी )

वय : २६ वर्षे, धंदा: घरकाम,

रा: प्लॉट क्रमांक ७५, मल्हार, सेक्टर एन-१, सिडको,

छ. संभाजीनगर, जिल्हा: छ. संभाजीनगर. .... उत्तरवादी

अपीलकर्त्यासाठी वकिल:- श्री. स्वप्नील जोशी एच/एफ एम/एस जे. पी. लीगल असोसिएट्स,

उत्तरवादींसाठी वकील. श्री. एम. डी. स्वामी यांच्या निर्देशाखाली श्री.संजीव देशपांडे, वरिष्ठ वकील

**न्यायमंच : न्यायमूर्ती.श्रीमती विभा कंकणवाडी व**

**न्यायमूर्ती श्री.एस.जी. चपळगावकर.**

**न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक :- ०१ एप्रिल २०२४**

**न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक:- १५ एप्रिल २०२४.**

**न्यायनिर्णय (न्यायमूर्ती श्री एस जी. चपळगावकर यांचे द्वारे,):-**

१. अपीलकर्ता / मूळ उत्तरवादी यांनी छ. संभाजीनगर येथील कौटुंबिक न्यायालयाने याचिका क्र. बी -०८/२०२३ मधील निशाणी -१५ वर दिनांक -२६.०२.२०२४ रोजी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये कबुली वर न्यायनिर्णय देण्यास नकार दिल्याच्या आदेशाला विरोध केला आहे.

२. सध्याच्या अपिलाला उध्दभवणारी संक्षिप्त तथ्ये खालीलप्रमाणे सांगितली जाऊ शकतातः

अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांचा विवाह सोहळा दिनांक-१३/०३/२०२३ रोजी औरंगाबाद येथे हिंदू धर्म व रीतीरिवाजांनुसार पार पडला आहे. हे अरेंज मॅरेज होते. उत्तरवादीचा (मुळ याचिकाकर्ता) असा युक्तिवाद आहे की दुर्दैवाने लग्नामुळे तिला त्रास झाला आणि फसवणूक झाल्याची भावना आली कारण अपीलकर्त्याच्या (मुळ उत्तरवादी) नात्यातील अनास्थेमुळे वैवाहिक संबंध १७ दिवसांपेक्षा जास्त टिकवता येऊ शकले नाहीत. या काळात विवाह परिपूर्ती होऊ शकली नाही. दिनांक- १६/०३/२०२३ रोजी अपीलकर्त्याच्या बहिणीने फुलांनी आणि पाकळ्यांनी खोली सजवली. मात्र, अपीलकर्त्याने सर्व विस्कटले आणि शारीरिक संबंधांना नकार दिला. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक-१७/०३/२०२३ रोजी तो आजी-आजोबांसोबत झोपला. दिनांक-२३/०३/२०२३ रोजी हे जोडपे हनीमूनसाठी बेंगळुरूला गेले होते, परंतु या ट्रिपदरम्यान कोणतेही शारीरिक संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत. जेव्हा उत्तरवादीने अपीलकर्त्याच्या असामान्य वागणुकीबद्दल तक्रार केली, तेव्हा तो संतापला आणि उत्तरवादीला घर सोडण्यास सांगितले. त्यानंतर कौटुंबिक बैठकांचे प्रसंग आले. मात्र, कोणताही तोडगा निघू शकला नाही. 'सापेक्ष नपुंसकता' स्वरूपाच्या पतीच्या काही मानसिक किंवा शारीरिक अपंगत्वामुळे वैवाहिक संबंध पूर्ण होऊ शकले नाहीत, असा युक्तिवाद

उत्तरवादीने केला आहे. या पार्श्वभूमीवर तिने हिंदू विवाह अधिनियमाच्या कलम १२ (१) (अ) अन्वये विवाह रद्द करण्यासाठी आणि विवाहशून्य करण्याचा हुकूमनाम्यासाठी कौटुंबिक न्यायालयात धाव घेतली. अपीलकर्त्याने आपले उत्तर दाखल केले. विवाह परिपूर्ती पूर्ण होऊ शकली नाही, अशी कबुली त्यांनी दिली. मात्र, त्यासाठी उत्तरवादीला जबाबदार धरले गेले.

३. उत्तरवादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ नुसार स्वीकृतीवर न्यायनिर्णय देण्यासाठी निशाणी -१५ खाली अर्ज दाखल केला आणि असा युक्तिवाद केला की अपीलकर्त्याने लेखी निवेदनात कबूल केले आहे की दिनांक-३०/०३/२०२३ रोजी विभक्त होईपर्यंत विवाह परिपूर्ती होऊ शकले नाहीत. १५ दिवसांच्या अल्पवास्तव्यात अपीलकर्ते आणि उत्तरवादी एकमेकांशी मानसिक, भावनिक किंवा शारीरिकरित्या संपर्क साधू शकले नाहीत, अशी कबुलीही त्यांनी दिली आहे. अपीलकर्त्याने निशाणी १५ खाली अर्जावर आपले उत्तर दाखल केले. प्रतिउत्तराच्या परिच्छेद क्र.४ व ५ मध्ये ते असे म्हणतात:

> *"४. उत्तरवादी म्हणतो की तो पूर्णपणे सामान्य आहे आणि त्याच्या उत्तरात नमूद केल्याप्रमाणे विशिष्ट परिस्थितीत, तो विशेषत: याचिकाकर्त्याशी शारीरिक संबंध ठेवू शकला नाही आणि अन्यथा नाही.*
>
> *५. दुर्दैवाने हे लग्न उत्तरवादीसाठी एक दु:स्वप्न ठरले आणि त्याला त्याच्यावर कोणताही कलंक नको आहे, परंतु याचिकाकर्त्याप्रती त्याची अपरिहार्य नपुंसकता (सापेक्ष नपुंसकता) उत्तरवादीच्या उत्तरात स्पष्ट केलेल्या तिच्या वागणुकीमुळे होती आणि आहे."*

४. कौटुंबिक न्यायालयाने संबंधित पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर निशाणी -१५ खालील अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे हे अपील करण्यात आले आहे.

५. अपीलकर्त्याची बाजू मांडणारे विद्वान वकील श्री. जोशी यांनी युक्तिवाद केला की, अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांच्यातील विवाह दुःस्वप्न होते . विवाहानंतर अवघ्या १७ दिवसांत हे नातं संपुष्टात आला. विवाहपरिपूर्ती न होता ते विभक्त झाले. याचिकाकर्त्याने

आपल्या लेखी जबाबात तसेच स्वीकृतीवर न्यायनिर्णय मागणाऱ्या अर्जाला सादर केलेल्या उत्तरात आपले वर्तन आणि सापेक्ष नपुंसकत्व मान्य केले आहे. त्यामुळे विवाह शून्यकरण्याचा हुकूमनामा मंजूर करण्याची विनंती त्यांनी केली असती. आपल्या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी त्यांनी ***सानू विरुद्ध संदीप*** [1] या खटल्यात केरळ उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने दिलेला न्यायनिर्णय आणि ***सुप्रभा जोएल गायकवाड (लग्नापूर्वी कु.सुप्रभा डेव्हिड घाटगे) विरुद्ध जोएल सोलोमन गायकवाड*** [2] या खटल्यात या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

६. उत्तरवादी-पत्नीची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. देशपांडे यांनी सादर केले की लेखी निवेदनामध्ये कबूल केलेले नसतानाही दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये दिलेले अधिकार वापरण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. ते पुढे सादर करतात की न्यायालयासमोर अभिलेखावरील इतर कोणत्याही पुराव्यावर कबुली निश्चित करता येत असेल, तर कबुलीवर न्यायनिर्णय देता येईल . ते पुढे म्हणतात की एकदा कबुलीजबाब एकतर याचिकेद्वारे किंवा इतर मार्गाने नोंदवला गेला की, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये अर्ज स्वीकारण्यासाठी न्यायालयाकडे व्यापक विवेकबुद्धी आहे . ***महेंद्र मणिलाल नानावटी विरुद्ध सुशीला महेंद्र नानावटी*** [3] या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेत ते आपल्या युक्तिवादाचे समर्थन करतात. त्यामुळे अपीलकर्त्याने त्याच्या लेखी निवेदनात तसेच निशाणी -१५ वरील अर्जाच्या प्रतिउत्तरात दिलेली कबूली हे संयुक्तपणे 'सापेक्ष नपुंसकता'ची कबुली मानली गेली असती आणि कबुलीवर न्यायनिर्णय देता आला असता, अशी विनंती त्यांनी केली आहे.

1 २०१९ ए आय आर सी.सी .१०७७
2 १९९७ (१) एम.एल.जे ३२१
3 १९६५ एम.एच.एल.जे३६५

पक्षांनी हातमिळवणी करून परस्परविरोधी दावे केल्याच्या कौटुंबिक न्यायालयाच्या निरीक्षणावर त्यांनी टीका केली.

७. सध्याच्या अपीलातील मुख्य मुद्द्यावर निर्णय घेण्यापूर्वी, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांना दिनांक-२६/०२/२०२४ रोजीच्या आक्षेपित आदेशा विरुद्ध अपीलाच्या दाखल करून घेण्याच्या योग्यते संदर्भात या न्यायालयाचे समाधान करण्याचे आवाहन करण्यात आले होते, कारण त्या परिणामावर रजिस्ट्रीने आक्षेप घेतला आहे.

८. अपीलकर्त्याचे विद्वान वकील श्री. जोशी असे सादर करतात की कौटुंबिक न्यायालय कायदा, १९८४ च्या कलम १९ मध्ये कौटुंबिक न्यायालयाने दिलेला वादकालीन आदेश नसून, प्रत्येक न्यायनिर्णय किंवा आदेशावर उच्च न्यायालयात अपील करण्याची तरतूद आहे. ते असे सादर करतात की दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये पारित केलेला कोणताही आदेश हा त्या अर्थाने अंतिम न्यायनिर्णय असेल, जो त्या विशिष्ट विषयावरील वादाचा निर्णय घेतो. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ ते ***शाह शाह बाबूलाल खिमजी विरुद्ध जयाबेन डी. कनिया*** [4] आणि ***श्याम सेल अँड पॉवर लिमिटेड आणि अन्य विरुद्ध श्याम स्टील इंडस्ट्रीज लिमिटेड*** [5] या खटल्यां मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणांवर अवलंबून आहेत.

९. सध्याच्या प्रकरणात कौटुंबिक न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये दाखल केलेला अर्ज फेटाळून लावण्याच्या आदेशाला आव्हान दिले गेले आहे. ***शाह बाबूलाल खिमजी*** (उपरोल्लेखित) यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाशी संबंधित आदेशांच्या संदर्भात या मुद्द्याचा विचार केला. वादकालीन आदेशांची उदाहरणे, जी न्यायनिर्णय म्हणून मानली जाऊ शकतात, ती परिच्छेद क्रमांक १२० मध्ये निर्दिष्ट केली आहेत. परिच्छेद क्रमांक १२० च्या खंड ६ मध्ये नागरी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये कबुलीवर नायनिर्णय देण्याचा अर्ज फेटाळण्याचा आदेश हा न्याय निर्णय मानला जाऊ शकतो. ***श्याम सेल अँड पॉवर लिमिटेड आणि एक*** (उपरोल्लेखित) या प्रकरणाच्या

4 १९८१ ए. आय.आर. (एस.सी) १७८६
5 २०२३ (१) एस.सी.सी ६३४

बाबतीतही माननीय सर्वोच्च न्यायालयाने अशाच मताचा पुनरुच्चार केला आहे. परिच्छेद क्रमांक ११४ मध्ये असे निदर्शनास आले आहे की खटल्याच्या सुनावणीदरम्यान, खटला न्यायाधीशांनी अनेक आदेश देऊ शकतात, ज्यायोगे, दाव्याच्या सुनावणीदरम्यान पक्षकारांनी उचललेली काही विविध पावले नियमित स्वरूपाची असू शकतात तर इतर आदेशांमुळे एका किंवा दुसऱ्या पक्षाची काही गैरसोय होऊ शकते. असे आदेश निव्वळ वादकालीन असतात आणि खटला न्यायाधीशांनी पारित केलेल्या अंतिम न्यायनिर्णयाविरुद्ध अपील करताना संबंधित पक्षकार अशा आदेशांची तक्रार नोंदवू शकतात. तथापि, ते आदेश असे क्षणिक बाबी ठरवणारे न्यायनिर्णय असतील, किंवा पक्षांच्या महत्त्वपूर्ण आणि मौल्यवान अधिकारांवर परिणाम करतात आणि जे संबंधित पक्षांवर गंभीर अन्याय करतात

१० भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणातून समोर आलेली उपरोक्त साद्दश्य आपण लागू केल्यास हे स्पष्ट होते की दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये कबुलीवर न्यायनिर्णय देण्यास नकार देणारा आदेश हा न्यायनिर्णय ठरेल आणि कौटुंबिक न्यायालय अधिनियम,१९८४, चे कलम १९ अन्वये त्याविरोधात अपील करता येईल, कारण असा आदेश शेवटी पक्षांचा मौल्यवान अधिकार हिरावून घेतो. त्यामुळे सध्याचे अपील या न्यायालयापुढे दाखल करण्यायोग्य आहे, असे आमचे मत आहे.

११. या अपिलातील गुणवत्तेवरील युक्तिवादांचा विचार करता पुढील मुद्दे आमच्या विचारार्थ उभे राहतात.

*१. अपीलकर्त्याच्या लेखी निवेदनातील युक्तीवाद आणि निशाणी -१५ खालील अर्जात दिलेल्या प्रतिउत्तरातील "सापेक्ष नपुंसकता" ची कबुलीबाबतचे वादकथन हे हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२ (१) (अ) अन्वये विवाह रद्द करण्याचा खटला ठरविण्यासाठी ग्राह्य धरले जावू शकते का?*

*२. कौटुंबिक न्यायालय, औरंगाबाद यांनी निशाणी -१५ अन्वये दिलेला दिनांक-२६/०२/२०२४ रोजीचा आक्षेपित आदेश कायद्याने कायम ठेवण्यासारखा आहे का?*

*३. खटल्याच्या वस्तुस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ नुसार विवेक बुद्धीचा वापर करून कबुलीवर न्यायनिर्णय देण्यासाठी खटला तयार करण्यात आला आहे का?*

१२. उत्तरवादीने हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२ (१) (अ) नुसार विवाह रद्द करण्याची याचिका

सादर केली. तिच्या युक्तिवादाचा सारांश असा आहे की अपीलकर्त्याशी तिचे लग्न कधीही पूर्ण झाले नाही आणि वैवाहिक संबंध निर्माण करण्याचा संक्षिप्त प्रयत्न पूर्णपणे कोलमडला. ती पुढे असा युक्तिवाद करते की लग्न पूर्ण होण्याची शक्यता नाही आणि लग्नाच्या १७ व्या दिवसापासून ती तिच्या पालकांसोबत राहत आहे. या विवाहामुळे तिला वेदना झाल्या आणि तिची फसवणूक झाल्याची भावना निर्माण झाली. काही घटनांचे वर्णन करताना, ती सांगते की अपीलकर्त्या-पतीने पहिल्या रात्री सजावट फेकून दिली आणि तिच्याकडे पाठ फिरवून झोपला. मधुचंद्राच्या दौऱ्यादरम्यानही पती-पत्नीमध्ये लैंगिक संबंध ठेवण्यासाठी अपीलकर्ता-पतीच्या मानसिक किंवा शारीरिक अपंगत्वामुळे कोणतेही आकर्षण आणि आपुलकी निर्माण होऊ शकली नाही, ज्याला सापेक्ष नपुंसकता म्हणता येईल (याचिकाकर्त्याप्रमाणे), विवाह पूर्ण होऊ शकला नाही आणि भविष्यात अशी कोणतीही शक्यता नाही . उपरोक्त युक्तिवादास उत्तर देताना अपीलकर्ता-पती विशेषतः कबूल करतो की विवाह पूर्ण होऊ शकला नाही. मात्र, पत्नी प्रती बेजबाबदार वागणूक दर्शविते . अशा कबुलीच्या आधारे, उत्तरवादी-पत्नीने कबुलीवर न्यायनिर्णयसाठी निशाणी-१५ खाली अर्ज दाखल केला. खरे तर विवाहानंतर नवरा बायको १३ दिवस एकत्र राहिले, परंतु त्यांच्यात कोणतेही जिव्हाळ्याचे नाते किंवा आकर्षण निर्माण होऊ शकले नाही, असे सांगून अपीलकर्ता- पतीने अर्जाचे उत्तर दिले. उत्तराच्या परिच्छेद क्रमांक ४ आणि ५ मध्ये त्याने स्पष्टपणे नमूद केले आहे की जरी तो पूर्णपणे सामान्य असला तरी तो शारीरिक संबंध ठेवू शकला नाही, विशेषत: उत्तरवादी पत्नीशी आणि उत्तरवादी-पत्नीबद्दल अपरिहार्य नपुंसकता (सापेक्ष नपुंसकता) कबूल करतो.

१३. लेखी निवेदनातील युक्तीवाद आणि अपीलकर्ता-पतीनने दाखल केलेल्या निशाणी -१५ खालील अर्जाचे उत्तर यांचा एकत्रित विचार केल्यास अत्यंत महत्त्वाच्या दोन कबुली दिसुन येतील. पहिली म्हणजे विवाह पूर्ण होऊ शकला नाही आणि दुसरे म्हणजे अपीलकर्त्याची उत्तरवादीशी अपरिहार्य सापेक्ष नपुंसकता. उत्तरवादी अपीलकर्त्याविरुद्ध नपुंसकतेचे कारण देत विवाह रद्द घोषित करण्याची मागणी करते. ' सापेक्ष नपुंसकता' ही ज्ञात बाब आहे जी सामान्य नपुंसकतापेक्षा वेगळी आहे ज्यामध्ये विवाह पूर्ण करणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य होते म्हणजे संभोग करण्यास असमर्थता. अशा वादांची विविध कारणे ओळखली जातात जी शारीरिक किंवा मानसिक असू शकतात. पतीने पत्नीशी संभोग करण्यास टाळाटाळ केल्यास किंवा अयशस्वी ठरल्यास अक्षमतेचा निष्कर्ष काढला जाऊ शकतो. विविध न्यायालयीन

निर्णयांनुसार ओळखल्या जाणाऱ्या अशी उदाहरणे आहेत जिथे इन्व्हिनसिबिल आणि वैवाहिक संबंध ठेवण्यास सतत विरोध करणे हे नपुंसकत्व मानले जाते.

१४. सध्याच्या प्रकरणात लेखी निवेदनातील युक्तिवादातून आणि अर्जाच्या उत्तरावरून हे सहज लक्षात येते की अपीलकर्ता-पतीला उत्तरवादी-पत्नीशी सापेक्ष नपुंसकता आहे. पतीची सापेक्ष नपुंसकता हे विवाह पूर्ण न होण्याचे स्पष्ट कारण आहे. सानू (उपरोल्लेखित) प्रकरणात केरळ उच्च न्यायालयाच्या द्विदस्यीय खंडपीठाने परिच्छेद क्रमांक १२ ते १४ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले:

*"१२. सध्याच्या प्रकरणात, उत्तरवादीने जे कबूल केले आहे ते "सापेक्ष नपुंसकता" आहे. 'सापेक्ष नपुंसकता' या अभिव्यक्तीचा अर्थ काय आहे?सोप्या शब्दात सांगायचे तर, सापेक्ष नपुंसकता ही अशी स्थिति दर्शवते जिथे एखादी व्यक्ती एखाद्या विशिष्ट व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवण्यास असमर्थ असते, जरी तो/ती दुसऱ्या व्यक्तीशी सामान्य लैंगिक संबंध ठेवण्यास सक्षम असते. एखादी व्यक्ती सामान्यतः लैंगिक कृत्य करण्यास सक्षम असू शकते परंतु ती एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या तुलनेत ते करण्यास असमर्थ असू शकते. असमर्थता एकतर शारीरिक किंवा मानसिक असू शकते.कधीकधी असे घडते की एखादी व्यक्ती लैंगिक संबंध ठेवण्यास सक्षम असते, परंतु ती त्या विशिष्ट व्यक्तीसोबत करू शकत नाही.अशा वेळी त्या व्यक्तीला त्या विशिष्ट व्यक्तीच्या बाबतीत नपुंसक मानले पाहिजे, मग त्याची सामान्यत: सामर्थ्य कितीही असो. एक पुरुष एका महिलेच्या बाबतीत नपुंसक असण्याची शक्यता आहे, जरी तो इतर महिलांशी लैंगिक संबंध ठेवू शकतो. एक पुरुष त्याच्या पत्नीच्या बाबतीत नपुंसक असू शकतो, जरी तो इतर कोणत्याही स्त्रीच्या बाबतीत नपुंसक असू शकत नाही.*

*१३. सापेक्ष नपुंसकता हा विवाह रद्द करण्यासाठी न्यायालयाने मान्यता दिलेला आधार आहे (पहा सुप्रभा जोएल विरुद्ध जोएल सोलोमन(एआयआर १९९७ बॉम्बे १७१), वंदना सुभाष विरुद्ध सुभाष बेंजामिन (१९९४ (१) केएलटी ऑनलाईन ११०८ (बॉम्बे) = आय (१९९५) डीएमसी १८३), व्हिन्सेंट अडॉल्फ विरुद्ध जुम बीट्रिस (एआयआर १९८५ बॉम्बे १०३), कमला विरुद्ध जगदीश प्रसाद (एम ए एन यु/आरएच/०४६४/१९८५), शांताबाई ऊर्फ गौराबाई वि. ताराचंद (१९६५ केएलटी*

*ऑनलाईन १३०५ (एम.पी.) = एआयआर १९६६ एम.पी. ८), बावी वि. नाथ: (एआयआर १९७० जे.अँड के. १३०) आणि सुवर्णा विरुद्ध जी . एम. आचार्य (एआयआर १९७९ ए.पी. १६९).*

*१४. अपीलकर्त्याने युक्तिवाद केले आणि सिद्ध केले आहे की लग्नानंतर केवळ पाच दिवसांच्या कालावधीसाठी दोन्ही पक्ष एकत्र राहिले . उत्तरवादीचा तिच्याकडे कोणताही कल नसल्याने विवाह परिपूर्ण झाला नाही. असा युक्तिवादही तिने केला आणि सिद्ध केले. आता, उत्तरवादीने कबूल केले आहे की तो अपीलकर्त्यासाठी नपुंसक होता. या परिस्थितीत, असे दिसते की उत्तरवादीच्या सापेक्ष नपुंसकतामुळे अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांच्यातील विवाह पूर्ण झाला नाही हे शोधण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत. त्यामुळे या प्रकरणात लग्न रद्द करण्याचा हुकूमनामा मंजूर केला जाऊ शकतो ".*

१५. ***सुप्रभा जोएल गिकवाड*** (***लग्नापूर्वी कु.सुप्रभा डेव्हिड घाटगे***) (उपरोल्लेखित) या खटल्याच्या बाबतीत या न्यायालयाच्या खंडपीठाने परिच्छेद क्रमांक ६ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले:

*“आमच्या मतानुसार, ट्रायल कोर्टाने निशाणी २८ खाली दुरुस्ती अर्जाच्या मजकुरासह वाचलेल्या पत्रातील मजकुराच्या पार्श्वभूमीवर अपीलकर्त्या-पत्नीचे प्रकरण समजले होते का , तर ट्रायल कोर्टाचा असा निष्कर्ष निघाला असता की जरी वैद्यकीय दृष्टिकोनातून, उत्तरवादी-पती नपुंसक नव्हता, परंतु तो आपल्या पत्नीच्या- यातील अपीलकर्तीच्या समोर नपुंसक होता. पतीच्या सापेक्ष नपुंसकतामुळे ती तिच्या पतीसोबत राहू शकली नाही, असे पत्नीचे युक्तिवाद लक्षात घेता, आमच्या मते, तिने तिच्या पतीच्या म्हणजेच यातील उत्तरवादीच्या "सापेक्ष नपुंसकता" च्या आधारावर घटस्फोटाची मागणी करणारा दावा करणे योग्य आहे.”*

१६. उपरोक्त निरीक्षणे लक्षात घेऊन, सध्याच्या खटल्यातील तथ्यांचा विचार केला तर, आम्हाला असे आढळले आहे की लेखी निवेदनातील युक्तीवाद आणि अपीलकर्त्याने-पतीने निशाणी १५ खाली अर्जाला दिलेल्या उत्तरासह, अपीलकर्त्याच्या-पतीच्या सापेक्ष नपुंसकतेसंबंधी उत्तर वादी-पत्नीचे प्रकरण समजण्यासाठी पुरेसे आहे.

१७. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये कबुलीवर न्यायनिर्णय मिळावा,

यासाठी उत्तरवादी-पत्नीने अर्ज दाखल केला होता. प्रथमतः कौटुंबिक न्यायालयाने उत्तरवादी-पत्नीच्या लेखी निवेदनात नपुंसकता किंवा सापेक्ष नपुंसकत्वाची स्पष्ट कबुली नसल्याच्या कारणास्तव अर्ज विचारार्थ स्वीकारण्यास नकार दिला. दुसरे म्हणजे, लेखी निवेदन आणि निशाणी १५ खाली अर्ज दाखल केल्यानंतर, अपीलकर्ता-पती त्याच्या उत्तरात सापेक्ष नपुंसकतेविषयी प्रथमच कबुली देतो. अश्या कबुलीच्या आधारे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अंतर्गत विवेकाधीन दिलासा दिला जाऊ शकत नाही. आम्हाला असे आढळले आहे की कौटुंबिक न्यायालयाचे असे निरीक्षण कायदेशीर स्थितीशी विसंगत आहे जे या विषयावरील न्यायनिर्णयाच्या कॅटेना वरून काढता येते. आधीच्या परिच्छेदांमध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे, जर अभिलेखावरील कोणत्याही पुराव्यावरून कबुलीवर  निश्चित गेली जाऊ शकते, न्यायालयासमोरील लेखी जबाबावरून वरून नाही तर स्वीकृतीवर न्यायनिर्णय पारित केला जाऊ शकतो. सध्याच्या प्रकरणात अपीलकर्ता-पतीच्या वतीने लेखी जबाबात आणि  व दिनांक २२/११/२०२३ रोजी दाखल करण्यात आलेल्या उत्तराचे एकत्रित वाचनावरून, उत्तरवादी-पत्नीच्या प्रति सापेक्ष नपुंसकत्वाची कबुली संकलित करता येईल.

१८. नागरी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ मधीलअनुतोष  विवेकाधीन आहे आणि अधिकारांचा वापर काळजीपूर्वक आणि सावधगिरीने केला पाहिजे, असे कौटुंबिक न्यायालयाने योग्यच निरीक्षण नोंदवले असले तरी दिलासा मिळविण्यासाठी पक्षकार संगनमत करीत असल्याचे कौटुंबिक न्यायालयाचे पुढील निरीक्षण अनुमानात्मक वाटते. लग्नाच्या नैराश्याचा त्रास सहन करणाऱ्या तरुण जोडप्याची ही बाब आहे, याकडे न्यायालय दुर्लक्ष करू शकत नाही. अपीलकर्ते-पतीने आपल्या लेखी जबाबात  विवाह परिपूर्ण  होऊ शकले नाहीत याची कबुली दिली आणि यात उत्तरवादी-पत्नीची काही चूक असल्याचे सांगितले. मात्र, कबुलीवर न्यायनिर्णय मागणाऱ्या अर्जाला उत्तर देताना त्यांनी पत्नी प्रति सापेक्ष नपुंसकता स्पष्टपणे मान्य केली आहे.  सध्याच्या खटल्यातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता लेखी कैफियत दाखल करताना अपीलकर्ता -पतीला सापेक्ष नपुंसकता स्वीकारण्यास संकोच वाटला असण्याची शक्यता आहे. मात्र, नंतर त्याने त्यामुळे आपल्यावर आजीवन कलंक लागणार नाही, याचे समाधान झाल्याने ही गोष्ट उघडपणे मान्य केली. सापेक्ष नपुंसकता ही नपुंसकताच्या सामान्य कल्पनेपेक्षा काहीशी वेगळी आहे आणि सापेक्ष नपुंसकत्वाचा स्वीकार सामान्य भाषेत त्याला नपुंसक ठरवणार नाही.  या पार्श्वभूमीवर, हे एक योग्य प्रकरण होते

जिथे न्यायालयाने आपल्या विवेकबुद्धीचा वापर करणे आणि विवाहपीडित तरुणांना विवाह अवैध ठरवून स्वतःचे मार्ग शोधण्यास मदत करणे अपेक्षित आहे. .  वर चर्चा केल्याप्रमाणे आमच्या मते, हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२ (१) (अ) अन्वये अक्षेपित आदेश रद्दबातल करून विवाह रद्द करण्याचा / शून्य करण्याचा हुकूमनामा पारित करण्यासाठी खटला तयार केला, परिणामी, आम्ही त्यानुसार विचारार्थ तयार केलेल्या मुद्द्यांची उत्तरे देतो आणि पुढील आदेश देतो:

<u>आदेश</u>

अ. कौटुंबिक न्यायालयाचे अपील मंजूर केले जाते.

ब. कौटुंबिक न्यायालय, औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक बी-०८/२०२३ मधील निशाणी -१५ अन्वये दिलेला दिनांक- २६/०२/२०२४ रोजीचा न्यायनिर्णय व आदेश रद्द बातल ठरवला जातो.

क. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १२ नियम ६ अन्वये कबुलीवर न्यायनिर्णयासाठी दाखल केलेला निशाणी -१५ वरील अर्ज मंजूर केला जातो.

ड. दिनांक-१३/०३//२०२३ रोजी अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांच्यात झालेला विवाह हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२(१)(अ) अन्वये रद्द केला जातो आणि अवैध घोषित केला जातो.

इ. त्यानुसार सदरचा विवाह रद्द केल्याचा हुकूमनामा पारित करण्यात येतो.

ई. कौटुंबिक न्यायालया औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्रमांक बी-०८/२०२३ वरील अटींमध्ये निकाली काढण्यात आली.

(न्यायमूर्ती श्री.एस. जी. चपळगावकर)        (न्यायमूर्ती श्रीमती. विभा कंकणवाडी)

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".